# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्रमांक 14 व 15 याठिकाणी राबविण्यात आली "डीप क्लीन ड्राईव्ह" मोहीम**

स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक 04 जानेवारी 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत, अति. आयुक्त अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त संभाजी पानपट्टे व उपायुक्त रवि पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात "डीप क्लीन ड्राईव्ह" ही मोहीम राबविण्यात आली आहे. वॉर्ड क्रमांक 14 व 15 याठिकाणी "डीप क्लीन ड्राईव्ह" ही मोहीम राबविण्यात आली आहे.

साई पॅलेस हॉटेल, डाचकुल पाडा, माशाचा पाडा, शाळा क्रमांक 19 रस्ता, मीनाक्षी नगर, मांडवी पाडा, निलकमल नाका, काशिमीरा, मिरा गावठण, चेना गाव, ठाकूर मॉल, मुंशी कंपाऊंड, डेल्टा गार्डन इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये सर्व विभाग प्रमुखांनी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष साफसफाई, स्टीकर्स काढणे, प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई, शौचालय स्वच्छ करणे, पुतळे धुणे, तुटलेली झाकणे दुरुस्ती करणे, शहरातील रस्त्यांची, दुभाजकांची, बस स्टॉपची स्वच्छता अशी असंख्य कामे सकाळी 7.00 वाजल्यापासून दुपारी 2.00 वाजेपर्यंत करून घेतली. मा. आयुक्त यांनी रस्त्यावरील धूळ स्वच्छतेसाठी स्वतः पुढाकार घेत अग्निशमन दलातील वाहनाच्या जेट स्प्रे व पाण्याच्या फवाराच्या सहाय्याने रस्ता सफाई मोहीम राबवली. सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" या मोहीमेत शहरातील जबाबदार नागरिकांनी सहभाग नोंदवून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.